





Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ  Mob- 9822720784  Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६२२ . वा | शनिवार | दि. ०९ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# नवाबचा जवाब द्या किंवा नका देऊ पण मनसेचा राज्य सरकारला गंभीर इशारा...

**वृत्तसंस्था/मुंबई**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नवाब मलिक यांच्यावरून राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे. भाजपा नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार नवाब मलिक यांच्या मुद्द्यावरून घेतलेल्या जाहीर भूमिकेमुळे महायुतीत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. नवाब मलिक यांना महायुतीपासून दूर ठेवावं, अशी विनंती करणारं पत्र देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना लिहिलं आणि हे पत्र सार्वजनिकही केलं. याचाच दाखला देत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं राज्य सरकारला फटकारलं आहे. मनसे अधिकृत या सोशल मॅडिया प्लॅटफॉर्मवरून एक फोटो शेअर करत मनसेनं सरकारला इशारा दिला. मनसेनं शेअर केलेल्या फोटोत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दोन्हीही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, तसेच मंत्री छगन भुजबळ आणि प्रफुल्ल पटेल दिसत आहेत. इतका स्नेह संबंध आहे तर पत्र का लिहावं लागतं? सुहास्य वदन दाखवण्याची ही कोणती धडपड? नवाबचा जवाब द्या किंवा नका देऊ पण तुम्ही घातलेल्या राजकीय ढोंगीपणाच्या नकाबचा जवाब मात्र तुम्हाला जनतेला द्यावाच लागेल नाहीतर जनता अगदी योग्यवेळी त्यांना गृहीत धरणाऱ्यांना धडा शिकवेल, अशा शब्दांत मनसेनं सरकारला इशारा दिला. अजित पवार काय म्हणाले?देवेंद्र फडणवीसांच्या पत्राबद्दल बोलताना अजित पवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेलं पत्र मला मिळालं असून मी ते पत्र वाचलं आहे. २ जुलैला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महायुतीला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. या सर्व घडामोडीनंतर नवाब मलिक हे कालच पहिल्यांदा सभागृहात आले आणि ते कुठे बसले हे सर्वांना माहीत आहे. मात्र त्यांनी स्पष्टपणे या सगळ्या घडामोडींबाबत भूमिका मांडलेली नाही. मलिक यांनी आपली भूमिका मांडल्यानंतर मी कालच्या पत्राबद्दल भूमिका मांडणार आहे, असं अजित पवारांनी म्हटलं आहे. यासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नावर बोलताना अजित पवार काहीसे चिडलेले पाहायला मिळाले.दरम्यान, नवाब मलिक यांच्यावर गंभीर आरोप असताना त्यांना महायुतीचा भाग करणे, हे योग्य होणार नाही, असं आमचं स्पष्ट मत आहे. आपल्या पक्षात कोणाला घ्यायचे, हा सर्वस्वी आपला अधिकार आहे. हे मान्यच आहे. परंतु,



त्यामुळे महायुतीला बाधा पोहोचणार नाही, याचा विचारही प्रत्येक घटक पक्षाला करावाच लागत असतो, असं म्हणत नवाब मलिकांना महायुतीपासून दूर ठेवा, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं.

# पुण्यावरून उलटे चालत श्रीपतरावांनी गाठली संतनगरी...

**जनसंचलन/ शेगाव**

सुमारे चारशे ते पाचशे कि मी. उलटे चालत जात देवदर्शन करणारे व पदयात्रेदरम्यान विविध विषयांवर जनजागृतीसाठी प्रसिध्द असलेले पुणे जिल्ह्यातील फुरसुंगी येथील भाविक बापूराव उर्फ श्रीपतराव दगडोपंत गुंड हे पुणे ते शेगाय असे ४८१ कि.मी. अंतर कापून आज द्वारी श्री संत गजानन महाराजांच्या चरणी माथा टेकविण्यासाठी संतनगरीत पोहोचले १८ नोव्हेंबर रोजी ते पुणे येथून निघाले होते.



फुरसुंगी येथील भाविक बापूराव गुंड हे गेल्या वीस वर्षांपासून सुमारे ४० कि.मी.चे अंतर कापून श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापुर येथे जात असतात. यंदा त्यांनी विदर्भ पंढरी शेगावकडे प्रस्थान केले आहे. फुरसुंगी येथून सुमारे ४८१ कि.मी. चे अंतर उलटे चालल्यानंतर आज दुपारी ४.३० वाच्या सुमारास ते संतनगरीत दाखल झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार फुरसुंगी येथील बापूराव गुंड हे कापड दुकान चालवून कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवितात. २० वर्षांपासून श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी याच पध्दतीने जाण्याचा त्यांचा शिरस्ता आहे. उलट पावली चालण्याच्या पध्दतीसह ते यात्रेत सध्याच्या ज्वलंत विषयांची जनजागृतीही करतात. विशेष म्हणजे त्यांचा हा हटके प्रवास त्यांच्या घरापासून एकट्यानेच सुरू आहे. मुळगाव फुरसुंगीतून १८ नोव्हेंबरपासून बापूराव गुंड यानी उलट चालण्याच्या यात्रेस सुरुवात केली आहे. तेथुन शिरूर, अ.नगर, शेवगाव, जालना, दे.राजा मार्गे चिखली, खामगाव असे सुमारे ४८१ कि.मी. अंतर चालून आज ७ डिसेंबर रोजी ते संतनगरी शेगाव येथे पोहोचले आहेत

# तरोडा टोलनाक्यावर केली पती-पत्नीला मारहाण...

**जनसंचलन/खामगाव**

फास्टॅगमध्ये बॅलन्स नसल्याच्या कारणावरून शिवसेना (शिंदे) खामगाव तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांच्यासह त्यांच्या पत्नीला-ही मारहाण झाल्याची घटना रविवारी सायंकाळी ७:४५ वाजता राष्ट्रीय महामार्गावर शेगाव तालुक्यातील तरोडा टोलनाका येथे घडली.




याप्रकरणी दाखल तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी बुधव-ारी टोलनाक्यावरील भूषण नामक कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे. ते मित्र व पत्नीसह अकोल्याहून पिंप्री गवळी गावाकडे येत होते. त्यावेळी तरोडा टोलनाक्यावर त्यांनी आ-पली गाडी (क्र. एमएच ०४ एचएम १७५०) फास्टॅग लेनमध्ये लावली. फास्टॅग स्कॅन केल्यानंतर भूषण नामक आरोपीने फास्टॅगमध्ये बॅलन्स कमी असल्याचे सांगितले. त्यावर बघे यांनी बॅलन्स असल्याचे सांगितले. त्यावेळी आरोपी भूषण याने शिवीग-ाळ करून गाडी मागे घेण्याचे सांगत बॅलन्स टाकण्याचे म्हणाला. तसेच पैसे घेतल्याशिवाय गाडी सोडणार नाही, असे म्हटले. शिवीगाळ करण्याबाबत हटकले असता त्यांच्यात वाद झाला. त्यामुळे बघे जखमी झाले. हे पाहताच त्यांचा मित्र मदतीसाठी धावून आला. त्यालाही आरोप-ीने मारहाण केली, पतीला मारहाण होत असल्याचे पाहून बघे यांच्या पत्नी भांडण सोडवायला आल्या. आरोपीने त्यांना धक्का देत लोटपाट केली. आरोपीने दहशत माजवण्याचा प्रयत्न केल्याने टोलनाक्यावरील इतर कर्मचाऱ्यांनी वाद सोडवला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नमो महारोजगार मेळाव्यात तरुणांनी सहभागी व्हावे- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस...

**वृत्तसंस्था/नागपूर**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या संकल्पनेतून राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे तरूणांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्यासोबतच नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी नागपूर येथे दि. ९ व १० डिसेंबर २०२३ रोजी नमो महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात, ङ्गस्टार्टअप एक्सपोफही भरविण्यात येणार असून या आयोजनाची तयारी पूर्ण झाली आहे. शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अमरावती रोडवरील जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात उद्या (दि.९) सकाळी १० ला या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. दोन दिवसीय उपक्रमात सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेतच या स्टार्टअप एक्सपोचे आयोजन होणार आहे. या एक्सपोत स्टार्टअप्स, इनवेस्टर्स आणि इनक्युबेटर्ससह इच्छुकांनी सहभागी होण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. विदर्भातील तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी या महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजनासाठी ५ हजार उमेदवार क्षमतेचे सभागृह, आकर्षक मंच, माहिती व सुविधा केंद्र, ऑनस्पॉट नोंदणीकक्ष, मुलाखतीसाठी स्वतंत्र कक्ष व्यवस्था, देशभरातून येणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधी व अधिकाऱ्यांसाठी कक्ष तसेच माध्यम प्रतिनिधींसाठी माध्यम कक्ष अशा विविध सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या मेळाव्यात महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने स्टार्टअप संकल्पनेच्या माहितीपासून ते यशस्वी उद्योजक बनण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींबाबत तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विभागाच्या वेगवेगळ्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी इथे स्टॉल्सही उभारण्यात आले आहेत. स्टार्टअप सुरु करण्यासाठी लागणाऱ्या सर्व सोयी सुविधांची

नमो महारोजगार मेळावा

माहिती देण्यासोबतच इनोव्हेटर्सच्या सगळ्या शंकांचे निरसनही येथे केले जाणार आहे. महाराष्ट्रातील स्टार्टअप परिसंस्थेच्या विकासासाठी आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांना, उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाने ङ्गमहाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८ जाहीर केले. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व राज्यातील नाविन्यपूर्ण परिसंस्थेच्या अध्ययन आणि विकासासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी कार्यरत आहे. या माध्यमातून इच्छुकांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री. फडणवीस यांनी केले आहे.

# सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन फंडाचा प्रारंभ...

**जनसंचलन/बुलडाणा**



सशस्त्र सेना ध्वजनिधी संकलन दिनानिमित्त जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने सैनिक मंगल कार्यालय येथे नुकतेच संकलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष अपर जिल्हाधिकारी सुनिल विंचनकर हे होते तर कर्नल सुहास जतकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लिडर रुपाली सरोदे, तहसीलदार गिरीष जोशी, भूषण पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला सहकार विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्ह्यातील शहिदांच्या कुटूंबीयांचा सन्मान करण्यात आला तसेच प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरोदे रुपाली सरोदे यांनी केले तर कर्नल सुहास जतकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अपर जिल्हाधिकारी श्री. विंचनकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शगुन डोंगरदिवे व प्रतिमा खंडागळे यांनी केले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील माजी सैनिक, सैनिक परिवार व एनसीसी छात्र उपस्थित होते. आभार प्रदर्शन सुनिल उबरहंडे यांनी केले.



**बालविकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रकल्प बुलढाणा दक्षिण अंतर्गत झालेल्या मदतनीस भरती प्रक्रियेत संजना विशाल गाडेकर या अनाथ मुलीची अंगणवाडी मदतनीस या पदावर निवड झाली आहे.तिची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मा. श्रीमती रुपालीताई चांकणकर व बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती मंगल पांचाळ मॅडम**

# वीर सावरकर यांच्या बद्दल केलेल्या बेताल वक्तव्याबद्दल भाजपचे शहराध्यक्ष अनंता शिंदे यांच्या नेतृत्वात जाळला कॉंग्रेस नेते प्रियांक खरगे यांचा पुतळा...

**जनसंचलन/बुलढाणा**

थोर देशभक्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बद्दल कॉंग्रेस पार्टीने वारंवार अवमान जनक वक्तव्य करणे सुरूच ठेवले आहे. नुकतेच कॉंग्रेस नेते कर्नाटकचे कॅबिनेट मंत्री प्रियांक खरगे यांनी सुद्धा विर सावरकर यांच्या बद्दल अपमान जनक वक्तव्य केले आहे. ङ्गसावरकर हे काही वीर नव्हते. सावरकरांचे योगदान काय? जर मी प्रभारी असतो तर सुवर्ण विधानसभेत लावण्यात आलेले त्यांचे फोटो काढून टाकले असते, सावरकर अजिबात वीर नव्हते याबाबत मी आव्हान द्यायलाही तयार आहे.फ अश्या प्रकारचे बेताल वक्तव्य केल्याने तमाम भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले आहे. आज दि. ८ डिसेंबर २०२३ रोजी बुलढाणा शहरात सुद्धा भाजपच्या वतीने लोकसभा प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनात भाजपचे शहराध्यक्ष अनंता शिंदे यांच्या नेतृवात वसंतराव नाईक चौकात प्रियांक खरगे यांच्या पुतळ्याला चपला मारून पुतळा जाळण्यात आला व जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. भाजपा नेते विजयराज शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालय शिवालय येथे भाजपच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सकाळीच गर्दी करून या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला. प्रियांक खरगे यांच्या पुतळ्याला चपला मारत त्यांचा चौकात पुतळा जाळण्यात आला. मुर्दाबाद मुर्दाबाद प्रियंका खरगे मुर्दाबाद कॉंग्रेस पार्टी मुर्दाबाद अश्या घोषणाबाजी करून निषेध नोंदवला. अमर रहे अमर रहे वीर सावरकर अमर रहे विरो का अपमान नही सहेगा हिंदुस्थान अश्या अश्या प्रकारे जयघोष करून वीर सावरकरांबद्दल आदर व्यक्त केला. वीर सावरकर हे तमाम देशवासियांची अस्मिता असून त्यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याची प्रियांक खर्गे व कॉंग्रेसने माफी मागावी अन्यथा कर्नाटकात घुसून भाजपा कार्यकर्ते प्रियंका खरगे यांना धडा शिकवतील असा आक्रमक इशारा भाजपा शहराध्यक्ष श्री अनंता शिंदे यांनी यावेळी दिला आहे. तसेच





कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव श्री प्रा.विश्राम पवार यांनीही तीव्र शब्दात प्रियांक खरगे यांचा समाचार घेतला. या निषेध आंदोलनात भाजपा जेष्ठ नेते प्रदेश प्रतिनिधी श्री दिपकदादा वारे, भाजपा कामगार मोर्चा चे प्रदेश प्रतिनिधी श्री अण्णासाहेब पवार, माजी नगरसेवक श्री मंदार बाहेकर,श्री वैभव इंगळे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ सिंधुताई खेडेकर, महिला जिल्हा सरचिटणीस उषाताई पवार महिला जिल्हा उपाध्यक्ष सौ अलकाताई पाठक सौ शोभाताई ढवळे माजी नगरसेविका सौ वैजंतीताई कस्तुरे उपस्थित होते

# मलकापूर मध्ये प्रियांक खर्गे यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला चपला जोडे मारत जाळला पुतळा...

## खर्गे यांच्या वक्तव्यविरोधात भाजपा कार्यकर्ते आक्रमक...



**जनसंचलन/मलकापूर**

प्रियांक खर्गे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बाबतीत आक्षेपार्ह वक्तव्य केल्यानंतर त्या विरोधात संपूर्ण राज्यभर आता पडसाद उमटताना दिसत आहेत, त्याच पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरांमध्ये प्रियांका खर्गे यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे चपला मारत पुतळा जाळण्यात आलाय, त्याचबरोबर खर्गे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे, अशा पद्धतीच्या मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहे...

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मतिमंदाची जमीन बळकावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यासाठी सरसावली वंचित युवा आघाडी...

## पीडित कुटुंबीयांना न्याय न दिल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा दिला इशारा...

जनसंचलन/बुलढाणा

चिखली तालुक्यातील आमखेड येथील मतिमंद शिवाजी गवई यांच्या मालकीची ०.७० आर शेतजमिन चिखली येथील अमोल सुरेशआप्पा खबुतरे यांनी बळकावल्याचा आरोप करत मतिमंद मुलगा शिवाजीला सोबत घेऊन ७० वर्षीय आई कासाबाई गवई यांनी न्याय मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. मात्र, प्रशासनाने दखल न घेतल्याने या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी पुढाकार घेतला आहे. फसवणूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल न झाल्यास पक्षाच्या वतीने तीव्र आणि व्यापक स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पवार यांनी दिला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वृद्ध आई आणि मुलगा उन्ह, वारा, पाऊस आणि थंडीचा मारा सहन करत उपोषणाला बसले असतानादेखील प्रशासनाने दखल घेतली नाही. ही बाब समजताच वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी उपोषण मंडपाला भेट देऊन प्रकरण समजून घेतले. मागासवर्गीय मतिमंदावर अन्याय झाल्याने पवार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन चर्चा केली. गवई कुटुंबीयांची जमीन बळकावल्याप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करावे, अशी मागणी करण्यात आली. आमखेडचे रहिवासी शिवाजी सुदाम गवई हे गतिमंद आहेत. गट नंबर ४६ मधील त्यांच्या मालकीच्या ०.७० आर जमिनीचे अमोल सुरेशआप्पा खबुतरे या व्यक्तीने बेकायदेशीर खरेदीखत करवून घेतले. शिवाजी गवई यांची ही जमीन वडिलोपार्जित असून त्यांना संबंधित जमीन वगळता उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. त्यांना दोन अपत्ये असून, वृद्ध आई, वडील आहेत. त्यांची उपजीविका याच जमिनीवर अवलंबून आहे. तसेच कोणत्याही व्यक्तीला भूमिहीन करता येत नाही, असा शासन निर्णय आहे. कमकुवत व्यक्तीची आर्थिक फसवणूक करून त्यांची मालमत्ता लुबाडणे ही बाब मानवतेला काळिमा फासणारी आहे. त्यामुळे अमोल सुरेशआप्पा खबुतरे व बेकायदेशीर खरेदीखत करून देणारे तत्कालीन सब रजिस्ट्रार तसेच या प्रक्रियेमध्ये सहभागी असलेल्या लोकांवर ॲट्रॉसिटी ॲक्टसह आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्याची मागणी सतीश पवार यांनी केली आहे. प्रशासनाने पीडित कुटुंबीयांना न्याय न दिल्यास उग्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे




# सोयाबीन-कापूस प्रश्नाबाबत रविवारी केंद्रीय वाणिज्य मंत्र्यांसोबत तुपकरांची मुंबईत बैठक

## रविकांत तुपकरांना थेट उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीसांकडून निमंत्रण...



जनसंचलन/बुलढाणा

सोयाबीन-कापूस प्रश्नाबाबत आठ दिवसात केंद्रीय मंत्र्यांसोबत बैठक लावू, असा रविकांत तुपकरांना उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द अखेर पूर्णत्वाकडे जात आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत रविवारी मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी शासनाच्या वतीने रविकांत तुपकर यांना रीतसर निमंत्रित करण्यात आले आहे. खुद्द राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी रविकांत तुपकरांना फोन करून बैठकीबाबत कळविले.

# खासदार प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील महायुतीच्या आमदाराच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट

जनसंचलन/बुलढाणा

शिवसेना नेते खासदार प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील महायुतीच्या आमदाराच्या शिष्टमंडळाने घेतली राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट व बुलडाणा लोकसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विषयावर चर्चा केली. यामध्ये प्रथम खांमगांव-जालणा रेल्वे मार्गचा प्रलंबित असलेला विषय म्हणजे ५० टक्के निधी चा वाटा राज्य सरकार देणार असल्याचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. व विदर्भातील शेतकऱ्यांसाठी सिंचनाची व्यवस्था निर्माण करणारा वैनगंगा नळगंगा



या महत्वकांशी नदीजोड प्रकल्पामध्ये पैनगंगा चा समावेश करावा,अशी आग्रही मागणी खासदार प्रतापराव जाधव यांनी केली आहे.व तसेच अन्य विविध विषयांवर चर्चा करण्यात आली आहे. यावेळी आमदार संजय रायमुलकर,आमदार आकाश फुंडकर,आमदार संजय गायकवाड, व आमदार सौ श्वेताताई महाले उपस्थितीत होते

# रुग्णालयातील कनिष्ठ लिपिकाला ४० हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

जनसंचलन/ शेगाव




आश्वासित प्रगती योजनेच्या फरकाचे देयक अदा करण्यासाठी महिला कर्मचाऱ्याकडून ४० हजार रुपयांची लाच घेताना शेगावातील सईबाई मोटे उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील कनिष्ठ लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुरूवारी सापळा रचून रंगेहाथ पकडले. रुग्णालयातील एका महिला कर्मचाऱ्याला आश्वासित प्रगती योजनेच्या फरकाचे देयक अदा करण्यासाठी कार्यालयीन आदेश तयार करून त्यावर वैद्यकीय अधीक्षक यांची सही घेऊन लेखा विभागाकडे पाठविण्यासाठी लिपिकाने लाच मागितली होती. याबाबतची तक्रार संबंधित कर्मचाऱ्याने बुलढाणाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली. त्यामध्ये सईबाई मोटे रुग्णालयातील कनिष्ठ लिपिक मंगेश जगन्नाथ जोशी याने ४० हजार रुपये मागितल्याचे नमूद केले. २ नोव्हेंबर रोजी याबाबत पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये नोव्हेंबर महिन्याच्या पगारासोबत बिलाची रक्कम जमा झाल्यानंतर स्वीकारणार असल्याचे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांचा नोव्हेंबर महिन्याचा पगार झाल्याने तक्रारदार यांना लाचेची रक्कम घेऊन बोलावले. त्यानुसार गुरूवारी सापळा रचण्यात आला. त्याचवेळी लाचेची रक्कम स्वीकारताना आरोपीला रंगेहाथ पकडण्यात आले. त्याच्याविरुद्ध शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे. ही कारवाई सापळा अधिकारी पोलिस उपअधीक्षक शीतल घोगरे, पोलिस निरीक्षक सचिन इंगळे, एएसआय भांगे, पोहेकॉ. प्रवीण बैरागी, व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

# बोदवड उपसा सिंचनचा मार्ग मोकळा

# खा. जाधव यांच्या प्रयत्नाने मिळणार ५६३ कोटींचा निधी...

## जिल्ह्यातील १३७४३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा फायदा

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा सिंचन व्यवस्थित झाल्याशिवाय शेतीला चांगले दिवस येणे अशक्य आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार तथा भूमिपुत्र प्रतापराव जाधव स्वतः हाडाचे शेतकरी असल्याने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी ते लोकसभेमध्ये सातत्याने पाठपुरावारुपी प्रयत्न करत असतात. बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा व मलकापूर या कायम आवर्षणग्रस्त तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या बोदवड परिसर उपसा सिंचन योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना पाणी मिळण्याचा मार्ग लवकरच मोकळा होणार आहे. केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाने योजनेला मूर्त रूप देण्याच्या दृष्टीने मान्यता दिली आहे. खासदार प्रतापराव जाधव यांनी यासंदर्भामध्ये वारंवार पाठपुरावा केला. तद्वतच लोकसभेमध्ये हे प्रश्न देखील लावून धरले. मोताळा व मलकापूर तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांसाठी बोदवड उपसा सिंचन योजना किती महत्त्वाची आहे, या संदर्भामध्ये केंद्र सरकारला जाणीव करून त्याचा पाठपुरावा सुरू ठेवला. प्रधानमंत्री कृषी सहाय्य योजनेअंतर्गत बोदवड उपसा सिंचन योजनेचा समावेश झाल्याने तब्बल ५३६ कोटी रुपयांचा निधी त्या अंतर्गत मिळणार असून खासदार प्रतापराव जाधव यांच्या मागणीमुळे शेतकऱ्यांचा हा मोठा प्रश्न मार्गी लागणार आहे. केंद्र शासनाच्या सार्वजनिक गुंतवणूक मंडळाच्या बैठकीत तापी पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत असलेल्या बोदवड परिसर सिंचन योजना टप्पा एकचा समावेश केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सहाय्य योजना अंतर्गत वेगवर्धित सिंचन योजनेत करण्याला मान्यता प्राप्त झाली आहे. टप्पा एकची एकूण किंमत २१४१.१९ कोटी रुपये असून त्या कामाप्रीत्यर्थ किंमत १९२३.८१ कोटी रुपये एवढी आहे. विदर्भातील ६१६७ हेक्टर व अवर्षण प्रवण भागातील ९५०७ तसेच सर्वसाधारण क्षेत्रातील ६५४६ हेक्टर अशा बुलढाणा जिल्ह्यातील १३७४३



हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा फायदा यातून मिळणार आहे. मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार ५३६.६४ कोटी रुपये येत्या तीन वर्षात केंद्र शासनामार्फत प्राप्त होणार असून उर्वरित ५४३.३५ कोटी राज्य शासनामार्फत खर्च करण्यात येणार आहेत. बोदवड उपसा सिंचन योजनेचा मुख्य स्रोत हातनूर धरण आहे. खासदार प्रतापराव जाधव यांनी कायमस्वरूपी या भागातील शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था व्हावी म्हणून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करत संसदेच्या २०२२ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यामध्ये बोदवड उपसा सिंचन योजनेसंदर्भात च्या अनुषंगाने आग्रही भूमिका देखील खा. प्रतापराव जाधव यांनी मांडली होती.

# नवाब मलिक लेटरबॉम्बनंतर भाजपचं संपूर्ण कॅडर फडणवीसांच्या पाठीशी ठामपणे उभं: चंद्रशेखर बावनकुळे

वृत्तसंस्था/ नागपूर

जनतेला अपेक्षित भूमिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. आमदार नवाब मलिक यांच्यासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली भूमिका धाडसी आहे. मलिक यांच्यावर देशद्रोह्यांना समर्थन केल्याचा आरोप आहे त्या विरोधातील ती भूमिका आहे. त्याचा वैयक्तिक राजकारणाशी काहीही संबंध नाही. भाजपाचे संपूर्ण कॅडर फडणवीस यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहेफ़, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना केले.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले,ङ्गइतर प्रकरणात केलेले आरोप आणि देशद्रोहासंदर्भात न्यायालयाने घेतलेली मलिक यांच्यासंदर्भातील भूमिका पाहता हे पत्र जाहीरपणे समोर आले. याचे भाजपा समर्थन करीत आहे. मलिक यांना याच आरोपावरून जेलमध्ये जावे लागले होते. सध्या ते वैद्यकीय जामीनावर असले तरी ते पूर्णत: आरोपमुक्त झालेले नाहीत. न्यायालयाने त्यांना आरोपमुक्त केले तर त्यांना सत्तेत घेण्यास भाजपचा विरोध असणार नाही. देशहिताच्या मुद्द्यावर महायुती तडजोड करणार नाही. अजित पवार प्रगल्भ नेते आहेत. ते फडणवीस आणि १४ कोटी जनतेच्या भावनांचा आदर करतील, अशी अपेक्षा आहे.फ़शिंदे गटाने ठाण्यात एका जागेवर दावा ठोकला आहे, या पार्श्वभूमीवर बोलताना बावनकुळे म्हणाले,ङ्गजो पक्ष यापूर्वी ज्या जागेवरून जिंकला आहे ती जागा त्यांचीच आहे. पण, त्याशिवाय कोण कुठून लढणार याबाबतचा निर्णय केंद्रीय नेतृत्व घेणार आहे. भाजप आणि इतर सर्व सहकारी पक्ष मिळून तयार झालेल्या महायुतीचे लक्ष्य ५१ टक्के जागा जिंकण्याचे आहे. त्यामध्ये आमची गरज पडल्यास आम्ही सहयोगी पक्षांना मदत करू. जिथे आम्हाला सहयोगी



पक्षांची मदत लागेल तिथे ते करतील. अद्याप कुठल्याही स्वरूपाचे जागावाटप झालेले नाही.

# सात लाख लोकांना चुकीचे वीज बिल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कबुली

वृत्तसंस्था/नागपूर

मीटर रिडर फोटो काढण्याचा कंटाळा करून खोटे फोटो लावून लोकांना चुकीचे बिल दिले जात असल्याचेही पुढे आले. या प्रकारांवर आळा बसावा यासाठी कठोर कारवाई करण्यात येईल. गेल्यावर्षी १४ लाख ३४ हजार चुकीचे बिल देण्यात आले होते. ही संख्या आता ७ लाखांवर आली आहेफ़ अशी कबुली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पालघर जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाला अवास्तव वीज देयके आकारल्याचा मुद्दा आमदार विनोद डहाणू यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला. ङ्गमीटरचे रिडिंग न काढता बिल देण्यात आले होते. अशी शक्यता आहे. नागरिकांच्या तक्रारीवरून त्यांना बिलात सवलती देण्यात आल्या आहेत. इतर तक्रारींचेही निराकरण करण्यात येईल. चुकीचे बिल देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईलफ़, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ०.३ टक्के चुकीचे बिल देण्यात आले आहे.स्वत: वीज मीटर रिडिंग घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. स्मार्ट मिटर लावण्यात येत आहे. यामुळे ही समस्या सुटेल. गावात वीज घेतात, मात्र पीडी झाल्यामुळे त्यांना वीज कनेक्शन दिले जात नाही. त्यांना पुन्हा वीज जोडणी करणारी योजना आणू, असे फडणवीस म्हणाले.वीज बिल समजणे कठीण आहे. त्यामुळे वीज बिल सोप्या पद्धतीने देण्यात यावे, अशी मागणी आमदार आशिष जयस्वाल



यांनी केली. अभय योजना आणण्यात येईल. बिलाचा फॉरमॅट अधिक सोईचा करण्याचाही प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन फडणवीस यांनी केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या सत्ताधारी अजित पवार गटातील समावेशाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोध केला आहे त्यामुळे ऐन हिवाळी अधिवेशन राजकीय वातावरण तापल्याचे पाहायला मिळतेय

# सिंदखेडराजा तालुक्यात हरबरा पिकाचे अतोनात नुकसान...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

तालुक्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणीत सापडला असून नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे हरभरा पिकावर रोगाचा प्रादुर्भाव होऊन सदर पिकाला मर लागून उभे पिक वाळले आहे. म्हणुन उभ्या हरबरा पिकात वखर घालून पुढच्या पेरणीसाठी शेतकर्यांना पर्याय शोधावा लागत आहे.त्यामुळे शेतकरी त्रस्त झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांनी परिसरात पाण्याचा कमी साठा असल्याने व पावसाळ्यात कमी पाऊस पडल्याने, कमी पाण्यात येणार्या हरबरा या पिकाची पेरणी मोठ्या प्रमाणात केली. हरबरा पिक ऐन बहरात असतांना नुकतीच अवकाळी पावसाने वादळी वारे व गारपिटांसह अचानक हजेरी लावली व कपाशीसह हरभऱ्याचे



अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी अत्यंत चिंतातुर झाला असून आता पुन्हा पेरणी करण्यासाठी बियाणे आणायचे कुठून ?आर्थिक तरतूद कशी करायची? असा प्रश्न निर्माण झाला आहे.त्यामुळे शासनाने सदर पिकांचे त्वरित पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची आग्रही मागणी परिसरातील शेतकरी करीत आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलडाणा

मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती तथा नवबौद्ध घटकांतील इयत्ता ११वी, १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्याक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत. या योजनेतंर्गत अशा प्रकारच्या सुविधा न मिळालेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या शासन निर्णयाद्वारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सन २०२३-२४ या वर्षासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेचा अर्ज http:// swadharyojana.com या लिंक वर जावून अथवा स्कॅन करून भरावा व विद्यार्थ्यांनी भरलेला अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, बुलडाणा या कार्यालयाच्या बाजूला असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, बुलडाणा येथे कार्यालयीन



वेळेत सादर करण्याचे आवाहन सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी समाज कल्याण विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत



## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...

**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day | Hight | Width |
|---|---|---|---|---|---|
| 8x8 cm | 5000/- | 3500/- | 2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Price | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

अजय राजगुरे-9922359674

ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा

Mail Id: jansanchlan@gmail.com